# मराठेकालीन कासेगाव परगण्यातील स्मारकांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास

**प्रा. डॉ. रविराज नामदेव कांबळे,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**इतिहास विभाग,**
**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.**
**मो.न. ९८८१२०७२१०**
Email ID: kraviraj1968@gmail.com

**प्रस्तावना :**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील कासेगाव हे एक अत्यंत महत्वाचे गाव आहे. कासेगावला शेकडो वर्षाची ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. बहामनी साम्राज्य, निजामशाही, आदिलशाही, शिवकाळ, मोगलशाही आणि पेशवाईच्या कालखंडामध्ये कासेगावचा उल्लेख सापडतो. मध्ययुगीन कालखंडामध्ये संताचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे श्रीक्षेत्र पंढरपूर हे कासेगाव परगण्यात समाविष्ट होते. अनेक शाह्यांच्या राजकारणाचे, युद्धाचे मानवनिर्मित आणि नैसर्गिक संकटांचे, भल्या-बुऱ्या अनुभवांचे गाठोडे कासेगावाने वागविले आहे. म्हणून कासेगाव हे सोलापूर जिल्ह्यातील एक ऐतिहासिक व महत्वाचे गाव ठरते.[१]

कासेगाव हे आदिलशाही राजवटीमधील परगण्याचे मुख्य ठाणे होते. कासेगावामध्ये अनेक देव-देवतांची मंदिरे, मशिदी, मठ, कबरी, गढी, तटबंदी, प्रवेशद्वारे आजही दिमाखात इतिहासाची साक्ष देत उभ्या आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने या ऐतिहासिक वास्तू अत्यंत महत्वाच्या आहेत.

**कसेगावचे स्थान:**

कासेगाव हे पंढरपूर पासून आग्नेय दिशेला ५ कि.मी. अंतरावर आहे. सोलापूर पासून ७४ कि.मी. अंतरावर आहे. कासेगावच्या पूर्वेस सिद्धेवाडी, अनवली पश्चिमेस माढवस्ती, नैऋत्येस खर्डी, दक्षिणेस तनाळी, उत्तरेस पंढरपूर ही गावे आहेत.[२]

**कासेगावचा इतिहास :**

विजापूरचा आदिलशहा इस्माईल आदिलशहाने इ.स.१६२७ मध्ये शहाजी राजे यांच्या दुसऱ्या विवाह प्रसंगी सन्मानपूर्वक पागा व लोक ठेवण्यासाठी कासेगाव महाल बक्षीस दिल्याची इतिहासात नोंद आहे.[३] २१ नोव्हेंबर १६३७ मध्ये महमंद आदिलशहाने लिहिलेल्या पत्रानुसार आदिलशहाने कासेगावास कार्यातचा दर्जा दिलेला होता. इ.स.१६३७ पूर्वी कार्यात कासेगावचा कारभार बाबाजी भोसले यांचेकडे दिलेला होता.[४] इ.स.१६७२ पर्यंत नाईकजी पांढरे हा कासेगावचा मुकासदार होता. १६७२ मध्ये कासेगावची देशमुख गोदाजी देशमुख यांच्याकडे दिल्याचे उल्लेख मिळतात. इ.स.१६८६ पर्यंत कासेगाव आदिलशहाच्या वर्चस्वाखाली होते. इ.स.१६८६ ते १७४३ पर्यंत ते मोगलांच्या ताब्यात होते. इ.स. १९४३ ते १८१८ पर्यंत ते पेशव्यांकडे होते. तर १० मे १८१८ ते १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत ते ब्रिटीशांच्या वर्चस्वाखाली होते.[५]

कासेगाव परागाण्यामध्ये ४२ गावे असल्याची नोंद पुणे पुराभिलेखागारमध्ये आहे. अखिल भारताची आध्यात्मिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे पंढरपूर हे कासेगाव परगण्याच्या कक्षेत मोडत होते. विठ्ठलाचे वास्तव्य पंढरपूरमध्ये असल्यामुळे पंढरपूरला साधूसंतांची मोठी परंपरा लाभलेली आहे. या परंपरेमुळे ही भूमी पावन झालेली

आहे. पंढरपूर व पंचक्रोशीतील कासेगाव आदी गावातील मातीच्या कणाकणात अनेक परिसराच्या अंगात मोठा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.[६]

**कासेगाव परगण्याचे वैभव :**

कासेगाव परगण्यामधील अनेक गावांच्या प्रशासकीय कारभार कासेगावचे देशमुख व देशपांडे पाहत होते. कासेगावला भौगोलिक स्थान चांगले लाभल्याने कासेगावच्या देशमुखांच्या कचेरीमधून प्रशासकीय कारभार चालत होता. परगण्याची प्रशासकीय कचेरी, देशमुखांची राहण्याची गढी, कासेगावमधील प्रवेशव्दारे, तटबंदी, घोड्यांच्या पागा, अंबरखाना, गढीमधील देवदेवतांच्या मूर्ती, देशमुखांच्या शास्त्रगारातील तलवारी, देशमुखांची शिक्के, आखीव-रेखीव व सुंदर आकर्षक देव-देवतांची मंदिरे हा ऐतिहासिक खजिना आजच्या काळात अत्यंत महत्वाचा ठरतो. आजच्या समाजातील तरुण पिढीला या वास्तू खूप प्रेरणादायी आहेत त्यांचे आपण जसजसे जतन करू आणि त्यांच्याशी निगडीत असणाऱ्या पूर्वीच्या कर्तबगार लोकांच्या स्मृती जसजशा आठवत राहू तसतसे त्यांचे आपणाला महत्व लक्ष्यात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून त्यांना आपण कासेगावचे वैभव म्हटले आहे.[७] कासेगाव परगण्यात पुढील ऐतिहासिक वास्तू आहेत.

**कचेरी :**

कासेगाव परगण्याचा दैनदिन कारभार करण्यासाठी स्वतंत्र कचेरी होती. तिला परगण्याचे कार्यालय म्हटले जात होते. राजवाड्याच्या(गढीच्या) समोरच्या बाजूस जवळच सरकारी कचेरी अस्तित्वात होती. टी कचेरी सध्या पडझड झालेल्या अवस्थेत आहे.

**वेशी (प्रवेशद्वार):**

**१. उत्तरवेस :**

पंढरपूरहून कासेगावमध्ये प्रवेश करतच उत्तर दिशेला एक प्रचंड उंचीची दगडी बांधकाम केलेली कमान (वेस) आहे. तीच उत्तर वेस आहे. या वेशीमधुनच कासेगावमध्ये प्रवेश करता येतो. ही भिंत आजही चांगल्या अवस्थेत उभी असून इतिहासाची साक्ष देत आहे. या भिंतीची जाडी ४ फुट आहे.

**२. दक्षिणवेस**

उत्तर वेशीतून प्रवेश करून पुढे यालम्मा देवीच्या मंदिराकडे जाताना गावाच्या दक्षिण दिशेस आणखी एक वेश पहावयास मिळते ही वेश उत्तरेकडील वेशीपेक्षा लहान आहे. ती आजही चांगल्या अवस्थेत आहे.

**देशमुखांची गढी :**

कासेगावमध्ये असलेली देशमुखांची गढी ही मध्ययुगीन काळातील अत्यंत देखणी इमारत होती असे तिचे प्रवेशद्वार पाहिल्यावर वाटते. ४०० वर्षापूर्वीचे प्रवेशद्वार आजही चांगल्या स्थितीत आहे. त्यावरून बांधकामाच्या भक्कमपणाचा अंदाज येतो. गढीस उत्तरेस मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन डोलदार बुरुज आहेत. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूस मोठ्या ओसऱ्या आहेत. तेथेच परगण्यातील खास लोकांच्या बैठका होत असत.

**प्रवेशद्वार :**

गढीला दोन प्रवेशव्दारे आहेत. उत्तरेला मुख्य प्रवेशद्वार असून दक्षिणेला दुसरे प्रवेशद्वार आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन डौलदार बुरुज आहेत. बुरुजावर जाण्यासाठी गढीच्या आतील भागातून जिना आहे. प्रवेशव्दार भक्कम असून लाकडी चौकट फार जुनी आहे. त्यावर गणेश प्रतिमा कोरलेली आहे. प्रवेशव्दाराच्या वरती दगडी शिळेवरही गणेश कोरलेला आहे.

**ओसऱ्या:**

प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूस मोठ्या ओसऱ्या आहेत. येथेच परगण्यातील लोकांच्या बैठका होता असत. विठ्ठल मंदिराच्या कारभाराच्या बैठका येथेच होत असत.

**घोड्याची पागा :**

मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर ओसरी लागते. त्यानंतर मोठा चौक लागतो. पुढे आत गेल्यानंतर घोड्यांची मोठी पागा दिसून येते. घोड्यांना बांधण्यासाठी वापरलेल्या कड्या अजूनही आहेत.

**अंबरखाना :**

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला तळघरे आहेत. त्याचा उपयोग धान्य साठवण्यासाठी केला जात होता. सध्या ते बंद आहेत. अंबरखान्याला दोन दरवाजे आहेत.

**गढीमधील मूर्ती :**

गढीमध्ये सध्या जुन्या दोन मूर्ती आहेत. एक शेषशाही विष्णु आणि दुसरी कृष्णाची मूर्ती आहे. त्या मूर्ती तांब्याच्या आहेत. गढीमध्ये कालिकादेवी मंदिर आहे. त्यांची परंपरागत पूजा केली जाते.

**पाणीपुरवठ्याच्या सोयी:**

गढीमध्ये पश्चिमेला एक आड आहे. त्यातून पाणी पुरवठ्याची सोय केली जात होती. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी भुयारी गटारदेखील होती. ते पाणी गावाच्या बाहेर सोडले जात होते.[९]

**कासेगावमधील महत्वाची मंदिरे :**

कासेगाव परगणा हा विविध जाती-जमाती, धर्म, पंथ आणि उपपंथातील लोकांनी मिळून तेथील समजा बनलेला होता. कासेगाव परगण्यातील देशमुख व देशपांडे स्वत: आध्यात्मिक प्रवृतीचे असल्यामुळे त्यांनी कासेगावमध्ये अनेक मंदिरांची स्थापना केली. कासेगावला अनेक देवदेवतांचे अधिष्ठान लाभले आहे. कासेगावमध्ये बारा ज्योतिर्लिंगे असल्याचे सांगितले जाते. महादेव मंदिर आणि खंडोबा मंदिर हेमाडपंथी आहेत. हनुमान मंदिरही प्रसिद्ध आहे. कासेगावच्या पूर्वेला ओढ्याच्या काठावर लिंगायत समाजाचा स्वामी मठ आहे. मठाजवळच एक जुने मंदिर आहे.

**भुवनेश्वरीदेवी मंदिर :**

कासेगावचे लोक धार्मिक असल्याने त्यांची श्रद्धास्थाने म्हणजे मंदिरे आजही अस्तित्वात असल्याचे दिसून येते. भुवनेश्वरी देवीचे मंदिर अत्यंत साधे आहे. व्यंकोजी बोवा उर्फ आड्याबा, माणकोजीबोवा यांच्या रानामध्ये भुवनेश्वरी देवीचे मंदिर आहे. या मंदिराचे पुजारी म्हणून कासेगावचे देशपांडे काम पाहत आहेत. देवीची यात्रा आणि उत्सव साजरा करण्यासाठी सातारच्या छत्रपतीकडून प्रतिनिधी मार्फत वतन जमीन धर्मदाय म्हणून दिली होती. प्रत्येक गावाकडून एक रुपयाप्रमाणे आर्थिक सहाय्य मिळत होते अशी माहिती इनाम जमीन कागदपत्रातून मिळते.[१०]

**श्री यल्लम्मा देवी :**

श्री यल्लमा देवी कासेगाव व आसपासच्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे व भक्तांचे आराध्यदैवत आहे. कासेगाव परगण्याचे देशमुख यांच्यामार्फत मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. परगण्याचे देशमुख यांना एक दृष्टांत झाला आणि तेथेच देशमुखांनी मंदिराची स्थापना केली. श्री यल्लम्मा देवीच्या स्थापनेस १२५ वर्षे झालेली आहेत. देवीची यात्रा-महोत्सव कासेगाव व आसपासचे भक्तगण मोठ्या श्रद्धेने भरवितात. यात्रेमध्ये ताटेदेशमुख, मोरे देशमुख व देशपांडे आणि इतर मानकऱ्याना मान दिला जातो. देवीसाठी आलेल्या प्रत्येक जोगत्यांना शासनाच्या वतीने देवदासीना चोळी, पातळ, सुगऱ्या यांचे वाटप केले जाते. देवीसाठी येणाऱ्या जोगात्याच्या बांगड्या आणि देवादासीच्या बांगड्या फोडल्या जातात. आणि त्याच वेळी ही यात्रा संपली असे घोषित केले जाते.११

**महामायादेवी (म्हमादेवी):**

हे जागृत देवस्थान म्हणून आजही प्रसिद्ध आहे. या देवीची यात्रा अश्विन नवरात्र घटस्थापना या दिवसापासून सुरु होते. सर्व स्त्री-पुरुष अन्न पाणी न खाता रोजाप्रमाणे उपवास करतात. या देवीच्या यात्रेच्या वेळी शाकाहारी व स्वच्छतेला अधिक महत्व दिले जाते. यात्रेच्या दरम्यान भाकणूक केली जाते. ही भाकनुक मानकर्यांच्या म्हणजे देशमुख देशपांडे यांच्या कानात सांगितली जाते. या देवीला परगण्याचे वारसदार वसंत नाना देशमुख यांच्या घरातून दररोज नैवेद्य दाखविला जातो.१२

**सारांश :**

कासेगाव हे मध्ययुगीन कालखंडातील एक ऐतिहासिक गाव आहे. त्याला आदिलशाही, निजामशाही, मोगल आणि मराठा कालखंडाच्या समृद्ध वारसा लाभला आहे. येथील स्थापत्य कासेगावचा सामाजिक-धार्मिक इतिहास पावलोपावली सांगताना दिसून येतात. कासेगावमध्ये देशमुखांनी बांधलेली गढी म्हणजे तो एक किल्लाच होता कि काय ? असा मनाला प्रश्न पडतो. तत्कालीन प्रजा या गढीला “सरकारवाडा” म्हणून मन देत होती. कासेगावला असलेली तटबंदी, दक्षिणेकडील व उत्तरेकडील देखणे प्रवेशद्वार, देशमुखीचे वंशज राहत असलेले देखणी गढी इत्यादी ऐतिहासिक वास्तू आजही दिमाखात कासेगावचा वैभवशाली इतिहासाची साक्ष देत उभ्या असलेल्या दिसून येतात.

**तळटीपा :**

१. प्रा. रविराज नामदेव कांबळे, कासेगाव परगण्याचा सामाजिक व आर्थिक इतिहास (१७४०-१८००), अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर- मे २०१६. पृष्ठ-१.
२. प्रा. अरुणचंद्र पाठक, महाराष्ट्रातील कला व स्थापत्यकला, श्रीराम पब्लिकेशन्स, पुणे, पृष्ठ-४२१.
३. श्री गोपाळ देशमुख, सोलापूर जिल्ह्याची बखर, रेवू प्रकाशन पंढरपूर-१९८१. पृष्ठ ३
४. ग. ह. खरे, ऐतिहासिक फारशी साहित्य प्रकाशन, भा. इ. सं. मं. पुणे, खंड ५ भाग २, १९६९.
५. प्रा. कांबळे पूर्वोक्त-पृष्ठ-४
६. जयश्री ज्ञानदेव रणनवरे, पंढरपुरचे सांस्कृतिक वैभव, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर-२००६. पृष्ठ ३३१.
७. प्रा. कांबळे पूर्वोक्त-पृष्ठ-२१-२४.
८. सौदागर अण्णा जाधव, निवृत्त प्राथमिक शिक्षक, कासेगाव यांची मुलाखत.
९. श्री. वसंत नाना देशमुख, कासेगाव परगण्याचे देशमुखांचे वंशज, रा. कासेगाव, ता. पंढरपूर यांची मुलाखत-२०५-२०६.
१०.परगणे कासेगाव वतनदार, जमीन महसूल पद्धती सातारा जमाव दप्तर, पुणे.
११.वामन धोंडो देशपांडे, प्रकाशक श्री यल्लम्मादेवी देवस्थान व्यवस्था मंडळ, कसबे कासेगाव, घटना व नियम मिती मार्गशीर्ष वद१२य शके १८५८, पृ.७-८
१२.श्री जाधव पूर्वोक्त, पृ.८८-८९.